# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

## ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर

**इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजना दूधगंगा नदी उद्धव सुळकूड येथे जॅकवेल हेडवर्क बांधणे**

या सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणे.

## --- भुसंपादनाची जाहीर नोटीस ---

कोल्हापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना या नोटीसीव्दारे कळविणेत येते की, विभाग राधानगरी, कागल तहसिल व तालुका कागल पैकी मौजे सांगाव, ता.कागल येथील खालील अनुसुची मध्ये दर्शविल्याप्रमाणे जमिन धारकांच्या खाजगी जमिनी मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांच्या नांवे इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी यांचे प्रधिकृत प्रतिनिधी आयुक्त तथा प्रशासकीय अधिकारी, इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर हे इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजना दूधगंगा नदी उद्धव सुळकूड येथे जॅकवेल हेडवर्क बांधणे या योजनेच्या कामासाठी आवश्यक जमिनी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्र.संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१२ मे २०१५, ३० सप्टेंबर २०१५ व दि.२५ जानेवारी २०१७ व दि. २७ नोव्हेंबर २०१७ मधील तरतूदी नुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र. भुसं/कार्या-११/आरआर/९३५/२०२२ दि.०२/११/२०२२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खाजगी वाटाघाटीने थेट सरळ खरेदी पध्दतीने सार्वजनिक प्रयोजनासाठी खरेदी करणेचे प्रस्तावित केले आहे.

खालील अनुसूचीमध्ये संबंधीत जमिन मालकाचे नांव, गट नंबर व संपादन क्षेत्र इ. तपशिल दिला आहे. सदर सूची ही या नोटीसीचा भाग जमजण्यात यावा सदर जमिनी बाबत जमिन मालकाच्या हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपुत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, लिज, कर्ज, बक्षिसपत्र, जप्ती, करारमदार व इतर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी ०९.४५ ते सायं. ६.१५ पर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने इकडील कार्यालयास कळवावे.

मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू जमिन मालकांची मिळकत निर्वेध व निर्जोख असल्याचे समजून इकडील कार्यालय महाराष्ट्र शासन, यांचे वतीने मुदतीनंतर केव्हांही पुढे थेट सरळ खरेदी पध्दतीने खरेदीची कार्यवाही पुर्ण करेल. दिलेल्या मुदतीनंतर कोणाची हरकत असल्यास ती या कार्यालयास कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही संपादन पूर्व नोटीस दिली.

तारीख - / /२०२३

E:\abhay sir\letter2023

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with CamScanner

## अनुसूची

कामाचे नांव :- इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजना दूधगंगा नदी उद्भव सुळकूड येथून जॅकवेल, हेडवर्क बांधणे, मौजे-क.सांगाव, ता. कागल खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणे.

| अ.क्र. | गट/सर्व्हे क्रमांक | गांव | एकूण संपादन करावयाचे क्षेत्र हे.आर. | जमिनधारकांचे/ मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | ११९८ पै. | कसबा सांगाव | ०.३८ आर | शबाना इकबाल मुल्ला,<br>अनिसा इकबाल मुल्ला,<br>दस्तगिर आबालाल मुल्ला,<br>रुबाब दस्तगिर मुल्ला |

विधी अधिकारी
इचलकरंजी महानगरपालिका

06/04/2023
आयुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

E:\abhay sir\letter2023

Scanned with CamScanner